Peer Reviewed International Research Journal of Geography
Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika
ISSN : 0971-6785 {Impact Factor 3.687 (IIFS)} Vol. 36, No.1, Jan-Jun. 2019. pp 49-53

# Growth Rate of Urbanisation : Study of Yavatmal District

Dr. Kalpana Deshmukh

***Abstract***

*Resource population, urban centers and rural centers play an important role in the development of any region. Yavatmal is the rural district in Maharashtra. Out of the total 16 tahsils in the district, only 8 tahsils are included in this urban area. The remaining 8 tahasils are included in rural areas. Accordingly, industries in Yavatmal district have not developed much. Whatever industries in the district are based on agricultural. Farmer suicide is highest in this district as it is an agricultural district. The research paper attempts to study whether the rate of urbanization has increased or decreased? How the rate of urbanization affects in the last 20 years in terms of development of such district.*

कोणत्याही प्रदेशाच्या विकासात संसाधन लोकसंख्या, त्या प्रदेशाची शहरी केंद्रे (Urban Ceatre) व ग्रामीण विभाग महत्त्वाची भूमिका बजावतात. यवतमाळ हा ग्रामीण विभागात मोडणारा जिल्हा आहे. या जिल्ह्यातील एकूण १६ तहसिल पैकी केवळ ८ तहसील या शहरी विभागात समाविष्ट आहेत. उर्वरीत ८ तहसिलींचा समावेश ग्रामीण भागात होतो. तद्वतच यवतमाळ जिल्ह्यात उद्योग फारसे विकसित झाले नाहीत. जे काही उद्योग आहेत ते सुध्दा द्रषीवर आधारित आहेत. तसेच शेतीबजहूल जिल्हा असल्याने शेतकरी आत्महत्या या जिल्ह्यात सर्वाधिक आहे. अश्या जिल्ह्याचा विकास होण्याच्या दृष्टीने शहरीकरणाचा दर गेल्या २० वर्शात कशा पध्दतीचा आहे, शहरीकरणाच्या दरात वाढ झाली की घट झाली आहे हे अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**बीजसंज्ञा :-** शहरीकरण, शहरीकरणाचा दर, विकास दर, ग्रामीण केंद्र, शहरी केंद्र.

**प्रस्तावना :-**

कोणत्याही देशाच्या, प्रदेशाच्या लोकसंख्या आकारात संसाधन लोकसंख्येला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तद्वतच त्या लोकसंख्येची गुणवत्ता ही महत्वाची असते. ही गुणवत्ता ज्याप्रमाणे जन्ममृत्यू प्रमाण, लिंगगुणोत्तर, स्थलांतर, व्यवसाय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक घटकांवर अवलंबून आहे, त्याचप्रमाणे शहरीकरण, शहरीकरणाचा दर व यावर सुध्दा अवलंबुन आहे. यवतमाळ हा विकसनशील व शेतीबहूल जिल्हा आहे. औद्योगिकदृष्ट्या मागास व शेतकरी आत्महत्यांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जातो म्हणून या जिल्ह्यातील शहरीकरणाचा दर व अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**उद्दीष्टये :-**

१) यवतमाळ जिल्हयातील शहरीकरणाचा दर अभ्यासणे.

२) यवतमाळ जिल्हयातील शहरीकरणाच्या दरातील वाढीचा अभ्यास करणे.

३) यवतमाळ जिल्हयातील शहरी वस्त्यांच्या वितरणाचा अभ्यास करणे.


**माहिती स्त्रोत व संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंध द्वितीयक स्वरूपाच्या समंकावर बेतलेला आहे. यवतमाळ जिल्हा गॅझेटीयर, जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, जनगणना पुस्तीका यातून आकडेवारी गोळा करून संख्याशास्त्रीय सूत्रांचा वापर केला आहे. तसेच समंकाचे रूपांतरण विविध निर्देशांकात करून त्याद्वारे सारणीकरण व आलेख पध्दतीने विषय विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यास क्षेत्र :-**

यवतमाळ जिल्हा हा महाराष्ट्रातील पश्चिम विदर्भ विभागात येतो. जिल्ह्याचा अक्षयवृत्तीय विस्तार १९°–२६′ ते २०°–४२′ उत्तर अक्षांश तर रेखावृत्तीय विस्तार ७७°–१८′ ते ७९°–९′ पूर्व रेखांश असा येतो. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १३५१९ चौ.कि.मी. असून ते महाराश्ट्राच्या क्षेत्रफळाच्या ४.४ % येते. जिल्ह्याच्या उत्तरेस वाशिम व अमरावती हे जिल्हे येतात. पश्चिमेस परभणी, पुर्वेस अकोला, उत्तरेस वर्धा आणि ईश्यान्सेस चंद्रपूर जिल्ह्याचा काही भाग येतो. दक्षिणेस नांदेड व आदिलाबाद (आंध्रप्रदेश) यांच्या सीमा आहेत. जिल्ह्यात एकूण १६ तालुके असून, मुख्यालय यवतमाळ, तर विभागीय मुख्यालय अमरावती येथे आहे.

**स्थानदर्शक नकाशा –**




यवतमाळ जिल्ह्यातील शहरीकरणाचा दर

**विषय विवेचन :-**

२०११ च्या जनगणनेनुसार यवतमाळ जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी २२.८७% लोकसंख्या शहरी भागात वास्तव्यास आहे. व ही शहरी लोकसंख्या जास्तीत जास्त यवतमाळ, पांढरकवडा, घाटंजी,

वणी, पुसद, उमरखेड, दारव्हा व दिग्रस या आठ शहरात आणि वडगांव, वाघापूर, वसंतनगर आणि उमरसरा या यवतमाळ नजीकच्या भागात विखूरलेली आहे. यवतमाळ शहर, वडगांवरोड, आणि वाघापूर येथील शहरी लोकसंख्येचे प्रमाण जिल्ह्यात सर्वाधिक आहे. तर सर्वांत कमी शहरी लोकसंख्या घाटंजी या शहराची आहे. जिल्ह्यातील कळंब, बाभुळगांव, राळेगांव, मारेगांव, नेर, झरीजामणी, आर्णी, महागांव या तहसिलांचा समावेश ग्रामीण लोकसंख्या विभागात होतो.

**यवतमाळ जिल्ह्यातील शहरीकरणाचा दर**

जिल्हयात १६ तहसिलपैकी ८ तहसिलचा समावेश शहरी लोकसंख्येत केला जातो. शहरीकरणाचा दर काढण्यासाठी खालील सुत्राचा वापरण्यात आला आहे.

$$\text{Rate of Urbanization} = \frac{\text{Urban Population of Tahasil-A}}{\text{Total Population of Tahasil-A}} \times 100$$


सारणीत दर्शविल्याप्रमाणे शहरीकरणाचा दर १९९१ ते २००१ या दहा वर्षात वाढलेला असला तरी त्यात लक्षणिय बदल झालेला नाही. सर्वाधिक शहरीकरणाचा दर यवतमाळचा असून २००१ मध्ये ४६.४८% वरून २०११ मध्ये ४९.१२% पर्यंत वाढ झाली आहे. दहा वर्शातील ही वाढ यवतमाळच्या तुलनेत वणी मध्ये अधिक झाली आहे. १९९१ मध्ये वणीचा शहरीकरणाचा दर २६.०७ % वरून २००१ मध्ये ३५.१७% पर्यंत वाढला. यवतमाळ जिल्हयात वणीची दहा वर्षातील शहरीकरणाच्या दराची वाढ जिल्हयात सर्वाधिक आहे. या दशकात यवतमाळचा शहरीकरणाचा दर ३% नी वाढला पण वणीची ही वाढ ९% आहे. वणीच्या खालोखाल यवतमाळचा क्रमांक लागतो. पांढरकवडा येथे शहरीकरणाचा दर १९९१ मध्ये १८.९५%होता. तो २००१ मध्ये २०.९६% वाढत म्हणजे जवळपास २% ची वाढ झाली. तसेच उमरखेड, पुसद आणि दारव्हा येथे अनुक्रमे २००१ मध्ये शहरीकरणाचा दर १८.३२, २५.५४ व १७.०५% असून तो २०११ मध्ये अनुक्रमे १९.४१, २६.२८ व १८.९८% पर्यंत वाढला. ही शहरीकरणाच्या दराची वाढ केवळ १% आहे. त्याचप्रमाणे घाटंजी आणि दिग्रस या दोन तहसिलमध्ये दहा वर्षात शहरीकरणाच्या दरात १% पेक्षाही कमी वाढ झालेली आहे. उर्वरित उमरखेड, दिग्रस व घाटंजी या तहसिलीमध्ये शहरीकरणाच्या वाढीचा दर मध्यम स्वरूपाचा आहे. संपूर्ण यवतमाळ जिल्ह्याचा अभ्यास करता जिल्हयाचा सरासरी शहरीकरणाचा दर १९% असा आहे.

२०११ मध्ये शहरीकरणाच्या दरात थोडी वाढ झालेली आहे. परंतु त्याला लक्षणीय वाढ म्हणता येणार नाही. संपूर्ण जिल्ह्याचा शहरीकरणाचा सरासरी दर १९९१ मध्ये १८.८०% २००१ मध्ये २०.८१% तर २०११ मध्ये २१.५६% असा आहे. अर्थातच गेल्या २० वर्शाच्या कालखंडात यवतमाळ जिल्ह्याच्या शहरीकरणाच्या दरात केवळ ३.५७% वाढ झाली आहे.

## Rate of Urganization 1991 to 2011

| Sr. No. | Tahsil | Rate of Urbanization % 1991 | Rate of Urbanization % 2001 | Rate of Urbanization % 2011 |
|---|---|---|---|---|
| 1) | यवतमाळ | 46.48 | 49.12 | 56.93 |
| 2) | बाभुळगांव | — | — | — |
| 3) | कळंब | — | — | — |
| 4) | राळेगांव | — | — | — |
| 5) | मारेगांव | — | — | — |
| 6) | वणी | 26.07 | 35.17 | 35.89 |
| 7) | पांढरकवडा | 18.95 | 20.96 | 22.46 |
| 8) | घाटंजी | 14.10 | 14.76 | 18.02 |
| 9) | उमरखेड | 18.32 | 19.41 | 20.46 |
| 10) | महागांव | — | — | — |
| 11) | पुसद | 25.54 | 26.28 | 26.24 |
| 12) | दिग्रस | 18.96 | 18.49 | 31.88 |
| 13) | दारव्हा | 17.07 | 18.98 | 16.92 |
| 14) | नेर | — | — | — |
| 15) | झरीजामणी | — | — | — |
| 16) | आर्णी | — | — | — |
| | जिल्हा सरासरी | 18.80 | 20.81 | 21.56 |

### GROWTH RATE OF URBANIZATION (1991-2011)




यवतमाळ जिल्ह्यातील एकूण १६ तालुक्यापैकी ८ तहसिल ग्रामीण भागात मोडतात. उर्वरीत ८ तहसिलीचा समावेश शहरी भागात होतो. (Urban Ceatre) या शहरी विभागातील आठ तहसिलीपैकी यवतमाळचा शहरीकरणाचा दर सर्वाधिक म्हणजे ५६.९३% झाला आहे. तर दारव्हा तहसिलचा हाच दर सर्वात कमी म्हणजे १६.९२% असा आहे. २००१ च्या तुलनेत यवतमाळ तहसिलचा शहरीकरणाचा दर ७.१८% नी

वाढला आहे. वणी मध्ये हा बदल फक्त ०.२७% चा असून तो नगण्य आहे. पांढरकवडा येथे गेल्या दहा वर्षात शहरीकरणाच्या दराची वाढ १.४५%, घाटंजी ३.५३%, उमरखेड ०.९%, पुसद ०.४%, दिग्रस १२.९४% अशा प्रमाणात झाली आहे. दिग्रस तालुक्या शहरीकरणाच्या दरात वाढ झाली असून पूसद व दारव्हा या दोन तालुक्यात गेल्या दहा वर्षात शहरीकरणाच्या दरात घट झाली आहे.

**निष्कर्श :-**

१) यवतमाळ जिल्हयाचा शहरीकरणाच्या वाढीचा दर १९९१ ते २००१ या दहा वर्षातील अतिशय कमी नगण्य असा आहे.

२) २००१ ते २०११ या दह वर्शात शहरीकरणाचा दरात थोडी वाढ झाली असली तरी वाढ लक्षणिय वाढ म्हणता येणार नाही.

३) यवतमाळ हा सर्वस्वी ग्रामीण भाग असलेला जिल्हा आहे. जिल्ह्यातील एकूण १६ तहसिलपैकी केवळ ८ तहसिल शहरी भागात मोडतात त्यातही केवळ यवतमाळ तहसिलाचा शहरीकरणाचा दर वाढला आहे.

४) यवतमाळ जिल्ह्यात उद्योगांचा फारसा विकास झाला नाही. जे उद्योग आहेत ते शेतमालावर आधारीत द्रशीउद्योग आहेत. परिणामी नोकरी व शिक्षण याच कारणाने लोकांचे शहरात वास्तव्य असल्याने शहरीकरणाच्या दरात फारशी वाढ झाली नाही.

**संदर्भ :-**


1) Bhagabati A.R. & Sahariah B. (1984) : Urban Centres and Spatial Pattern of their Road Accessibility in Assam p.14 ; Geographical Review of India, vol-46, Sept No.3

2) Das T.M. (1982) : Social Inequalitize and Rural Development P.33

3) Dasgupta Biplab, Mukharjee A.Co. Pvt.Ltd., (1988) : Urbanizutiopn, Migpation and Rural Change – A Study of West Bengal p.205.

4) Mandal R.B. (1982) : Urbanizution and Regional Development, Concept Publishing Com. New Delhi.

5) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा यवतमाळ अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्रशासन, मुंबई

6) District Census andbook, Yavatmal.



* **प्रा.डॉ.कल्पना देशमुख**
भूगोल विभाग प्रमुख
बाबाजी दाते कला आणि वाणिज्य
महाविद्यालय, यवतमाळ